# चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर
## (निवडणूक विभाग)

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

ई-मेल :- com.chandrapur@gmail.com कार्यालय दुरध्वनी क्र. ०७१७२-२५०२२०, २५५६५०

**जा. क्र. :- चंशमनपा/निवडणूक/२०२५/** ४४६६ **दिनांक :- ३० / १२ / २०२५**

**- निवडणूक तात्काळ -**

**// आदेश //**

ज्याअर्थी, मा. राज्य निवडणूक आयोगाने दिनांक १४ ऑक्टोंबर, २०२५ च्या पत्रान्वये मतदार यादी तयार करण्याबाबत दिलेल्या कार्यक्रमानूसार आणि त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणेनूसार दिनांक २० नोव्हेंबर, २०२५ रोजी चंद्रपूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५-२६ करिता प्रारुप मतदार याद्या प्रसिध्द करण्यांत आल्या.

ज्याअर्थी, सदर मतदार याद्यांवर दिनांक २० नोव्हेंबर, २०२५ ते ०३ डिसेंबर, २०२५ या कालावधीत हरकती व सुचना विचारात घेवून दिनांक २० डिसेंबर, २०२५ रोजी अंतिम मतदार याद्या प्रसिध्द करण्यांत आल्या.

ज्याअर्थी, सदर मतदार याद्या प्रसिध्द केल्यानंतर त्यामध्ये तपासणीतील चुकांमुळे अथवा कंट्रोल चार्ट अपलोड करतांना झालेल्या चुकांमुळे सोबतच्या परिशिष्टात दर्शविलेले मतदार ज्या प्रभागात असणे आवश्यक आहे त्या प्रभागाऐवजी दुसऱ्या चुकीच्या प्रभागात समाविष्ट झाल्याचे मतदार यादी तयार करण्यासाठी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले.

ज्याअर्थी, मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे दिनांक २२/१२/२०२५ चे आदेशान्वये दिनांक २४/१२/२०२५ पर्यंत यादीत दुरुस्ती केल्यानंतर त्याबाबतचा कंट्रोल चार्ट तयार करुन अपलोड करण्याची महानगरपालिकेला मुभा देण्यांत आल्याने, कंट्रोल चार्ट अपलोड करण्यांत आले असता, दुरुस्तीअंती १ मतदाराचे नांव सदर अंतीम मतदार यादीनूसार केंद्रनिहाय यादीमध्ये समाविष्ट झाले नसल्याचे निदर्शनांस आले.

ज्याअर्थी, मा. राज्य निवडणूक आयोगाने मतदार यादी विभागाजाना संदर्भातील दिनांक १६ जूलै, २०२५ च्या आदेशातील परिच्छेद क्र. ८ अन्वये अशा दुरुस्त्या नामनिर्देशपत्रे भरण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यत करण्याबाबत तरतुद आहे. तसेच त्यानूसार चुकांची दुरुस्ती करण्याबाबत दिनांक २५ नोव्हेंबर, २०२५ अन्वये आदेशित झाली आहे.

ज्याअर्थी, मतदार यादीतील सदर दुरुस्त्या वेळीच करुन त्यानूसार सुधारीत पुरवणी याद्या प्रसिध्द करणे आवश्यक असल्याची खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मा. राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त दिनांक १६ जूलै, २०२५ व २५ नोव्हेंबर, २०२५ च्या आदेशानूसार दुरुस्त अंतिम मतदार यादीनुसार दर्शविलेल्या योग्य प्रभागात व केंद्रनिहाय यादीमध्ये मतदार समाविष्ट करण्यांत येत आहे. सदर आदेश महानगरपालिकेच्या वेबसाईट **www.cmcchandrapur.com** वर टाकुन त्याची योग्य ती प्रसिध्दी करण्यांत येत आहे.

**(अकुनूरी नरेश, भाप्रसे)**
आयुक्त तथा निवडणूक अधिकारी,
चंद्रपूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५-२६